सरकारी रुग्णालयांवरील ताण आणि खाजगी रुग्णालयांमधील वाढता खर्च यामुळे सामान्य माणसाला आरोग्यसुविधा एक तर परवडत नाहीत किंवा कर्जात टाकतात, असे आपल्याला पाहायला मिळते. हृदयविकार, पॅरालिसीस, मूत्रपिंडातील बिघाड अशा गंभीर आजारांवर प्रचंड खर्च येतो. सामान्य माणसांची तो खर्च करण्याची ताकद नसते. अशा वेळी त्यांची सर्व बचत खर्च होऊन जाते. शिवाय अनेकदा त्यांना कर्ज काढावे लागते. घर विकण्याची, जमीन विकण्याची वेळसुद्धा अनेकांवर येत असते. ही पुढची अडचण टाळायची असेल तर केवळ आरोग्यविमा असून चालत नाही. त्यासाठी आता क्रिटिकल इलनेस इन्शुरन्स पॉलिसी म्हणजे गंभीर आजारासाठीचा विमा बाजारात उपलब्ध आहे.

क्रिटिकल इलनेस इन्शुरन्स पॉलिसी

प्रत्येकाकडे जीवन विमा असायला हवा, त्याचप्रमाणे आरोग्य विमासुद्धा असायला हवा, असे अलीकडे गुंतवणूक सल्लागार सांगत असतात. तुमच्याकडे आरोग्य विमा आहे, म्हटल्यावर तुम्हाला एखाद्या आजारानंतर रुग्णालयात जेवढा खर्च येतो, तेवढा खर्च मिळतो. काही अटी आणि शर्ती त्याला घातलेल्या असतात. त्यामुळे अनेकदा उपचारांचा सर्व खर्च भरून निघत नाही. याशिवाय तुम्ही कोणत्या रूग्णालयात उपचार घेत आहात, वगैरे गोष्टीसुद्धा अशा आरोग्यविम्यामध्ये तुम्हाला पाहाव्या लागतात. त्यामुळे अनेकदा आरोग्यविमा असूनसुद्धा आरोग्यविषयीच्या समस्येवर झालेला खर्च आपल्या हाताबाहेर जातो आणि मनस्ताप सहन करावा लागतो. यावर उपाय म्हणून क्रिटिकल इलनेस इन्शुरन्स पॉलिसी असा नवीन विमा गेल्या काही वर्षांपासून उपलब्ध झालेला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये आरोग्यावरचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. हा खर्च करणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेले आहे. सरकारी रुग्णालय यांवरील ताण आणि खाजगी रुग्णालयांमधील वाढता खर्च यामुळे सामान्य माणसाला आरोग्य सुविधा एक तर परवडत नाहीत किंवा कर्जात टाकतात, असे आपल्याला पाहायला मिळते. हृदयविकार, पॅरालिसीस, मूत्रपिंडातील बिघाड, स्ट्रोक अशा गंभीर आजारांवर प्रचंड खर्च येतो. सामान्य माणसांची तो खर्च करण्याची ताकद नसते. अशा वेळी त्यांची सर्व बचत खर्च होऊन जाते. शिवाय अनेकदा त्यांना कर्ज काढावे लागते. अशा कर्जाच्या वेळी घर विकण्याची, जमीन विकण्याची वेळसुद्धा अनेकांवर येत असते. ही पुढची अडचण टाळायची असेल तर केवळ आरोग्यविमा असून चालत नाही. त्यासाठीच आता क्रिटिकल इलनेस इन्शुरन्स पॉलिसी म्हणजे गंभीर आजारासाठीचा विमा बाजारात उपलब्ध आहे.

यात जर तुमच्या रुग्णाने विमा कंपनीच्या सर्व अटी पूर्ण केल्या तर विम्याचे सर्वच्या सर्व पैसे दिले जातात. विमा कंपनी कोणत्या हॉस्पिटलमध्ये रुग्ण दाखल आहे, खर्च किती झाला, नेमका उपचारावर किती खर्च झाला याची खोलात जाऊन चौकशी करीत नाही. रुग्णाला जर तो विशिष्ट आजार झाला तर कंपनी त्याला विम्याची सगळी रक्कम देते. ती रक्कम रुग्ण कोठे खर्च करतो, याची चौकशी करीत नाही. मिळालेल्या पैशाचा कसा वापर करायचा हे रुग्ण ठरवू शकतो. त्यामुळेच अलीकडे अशा पॉलिसी घेण्याचे प्रमाण वाढू लागले आहे.

क्रिटिकल इलनेस पोलिसीमध्ये अनेक गंभीर आजारांना संरक्षण दिलेले असते. कर्करोग, हृदयविकारावरील बायपास शस्त्रक्रिया, हृदयविकाराचा पहिला झटका, मूत्रपिंड निकामी होणे, स्ट्रोक, पॅरालिसीस, ब्रेन ट्यूमर, अंधत्व, पार्किन्सन्स, अल्जाइमर यासारख्या गंभीर आजारांचा या विमा पॉलिसीमध्ये समावेश असतो. वेगवेगळ्या विमा कंपन्या काही दुसऱ्या आजारांनाही संरक्षण देतात. या पॉलिसीचा क्लेम मिळवण्यासाठी रुग्णालयात दाखल होण्याचीसुद्धा आवश्यकता नसते. कंपनीला तुम्हाला तो आजार असल्याचे पुराव्यासह सांगणे एवढेच आवश्यक असते.

साध्या मेडिक्लेम पॉलिसीमध्ये हे त्या विमा कंपनीच्या नेटवर्कमध्ये असलेल्या रुग्णालयातच कॅशलेश सुविधा दिल्या जातात. अन्य रुग्णालयात उपचार घेतल्यास बिल सादर करावे लागते. हे बिल सादर केल्यावर तो खर्च दिला जातो. मेडिक्लेम पॉलिसीमध्ये तीन महिन्याचा प्रतीक्षा कालावधी असतो. क्रिटिकल इलनेस पॉलिसीमध्ये हा कालावधी केवळ तीस दिवसांचा असतो. पॉलिसी घेताना तुमचे वय जितके कमी तेवढा अधिक फायदा होतो. प्रतीक्षा कालावधी जेवढा कमी तेवढे चांगले. काही कंपन्या प्रतीक्षा कालावधी चार चार वर्षांचा ठेवतात. ज्या कंपनीचा क्लेम सेटलमेंट रेकॉर्ड चांगला असेल, त्या कंपनीकडून अशी पॉलिसी घ्यावी. आत्महत्या, जोखमीच्या खेळामधील सहभाग, अतिरिक्त दारूमुळे होणारा त्रास अशा कारणाने मृत्यू झाल्यास त्यांना संरक्षण नसते. त्याच्या एचआयव्ही-एड्स या व्याधीला पॉलिसीबाहेर ठेवण्यात आलेले आहे. इतर कोणत्याही पॉलिसी घेताना जसा आपण अटी आणि शर्तींचा विचार करतो, तसा या पॉलिसी घेतानाही अटी आणि शर्तींचा विचार केला पाहिजे. भारतातच अलीकडले वाढलेले गंभीर आजारांचे प्रमाण पाहता, आपण जीवन विमा घेतल्यानंतर आरोग्यविमा घेतो, तेव्हा क्रिटिकल इलनेस इन्शुरन्स पॉलिसीचा विचार केला पाहिजे. भविष्यात एखाद्या आजाराने ग्रासले तर अशा वेळी एकरकमी पैसे हाताशी आल्याने तो कुटुंबाला केवढा तरी मोठा आधार ठरू शकतो.

लक्षात ठेवा

प्रथमच गुंतवणुकीसंबंधी विचार करत असाल तर आधी बँकेत बचत खाते, रिकरिंग खाते उघडा. बचतीची सवय लागेल. बचत खात्यातील रक्कम हवी तेव्हा काढता किंवा भरता येते तर गुंतवणूक केलेली रक्कम मुदत संपल्यावर मिळते.

गुंतवणूक ही अधिक काळाकरिता असते. भविष्यातील तरतुदीसाठी बचतीच्या पैशाची गुंतवणूक वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून करता येते. गुंतवणूक करणे एक प्रकारची जोखीम असली तरी ही जोखीम कमी व्हावी म्हणून एकाच ठिकाणी गुंतवणूक न करता वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणूक करणे योग्य ठरेल. माहीत नसलेल्या कोणत्याही योजनेत जास्त फायदा मिळतो म्हणून पैसे गुंतवू नयेत.

आर्थिक गुंतवणूक करण्यापूर्वी प्रथम आर्थिक सल्लागाराची मदत घ्या. गुंतवणूक सरकारी कंपन्यांचे शेअर, विमा योजना, रियल इस्टेट, म्युच्युअल फंड, पीपीएफ, सोने यांमध्ये करता येईल. सरकारी कंपन्यांमध्ये केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरते. ओएनजीसी, टाटा कन्सल्टन्सी, भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स, आयटीसी, एलआयसी, स्टेट बँक ऑफ इंडिया आदी शेअर्समध्ये बाजारातील तेजी-मंदी बघून गुंतवणूक करता येते.

फिक्स डिपॉझिटमध्ये केलेली गुंतवणूक जोखमीची नाही. एफडीमध्ये गुंतवणूक करताना तुम्हाला या रकमेची गरज केव्हा लागेल ते लक्षात घेऊन ती रक्कम किती कालावधीसाठी फिक्स करायची हे ठरवा. मुदतीपूर्वी एफडी मोडल्यास पूर्ण रक्कम मिळत नाही. सोन्यामध्ये गुंतवणूक करताना दागिने घेण्यापेक्षा नाणी, चीप, बिस्कीट घेणे सोयीचे ठरेल. विमा पॉलिसी घेताना मुलांच्या नावावर पॉलिसी घेणे योग्य ठरेल. मुलांच्या भवितव्यासाठी हे पैसे उपयोगी पडतात शिवाय आयकरात सवलतही मिळते. पीपीएफमध्ये केलेली गुंतवणूक फायदेशीर व करमुक्त आहे. पीपीएफमध्ये पती-पत्नी, मुले यांची वेगवेगळी खाती उघडता येतात. हे खाते भारतातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये किंवा स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडता येते.

आयकर दाते असल्यास व आय करात सवलत मिळणार असेल तर भारत सरकारच्या नव्या पेन्शन स्कीम योजनेत गुंतवणूक करता येईल. नोकरीचे पैसे हातात आल्यावर आपले भविष्य आणि निवृत्तीचा काळही सुखाचा व्हावा यासाठी आर्थिक नियोजन करा.

केंद्राच्या पीएमजेएवाय योजनेस परवानगी देण्याची आ. जगतापांची मागणी

■ पिंपरी, प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमधील अनेक मोठ्या खासगी रुग्णालयांनी नोंदणी केलेली आहे. परंतु, या रुग्णालयांना ही योजना राबविण्यासाठी अद्याप परवानगी देण्यात आलेली नाही. परिणामी या योजनेचा लाभ घेण्यासाठी गेलेल्या पात्र रुग्णांना खासगी रुग्णालये उपचार नाकारत असून, रुग्ण उपचारांपासून वंचित राहत आहेत.

त्यामुळे या योजनेसाठी नोंदणी केलेल्या पिंपरी-चिंचवडमधील खासगी रुग्णालयांना आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांवर उपचारासाठी परवानगी प्रमाणपत्रे देण्यात यावीत, अशी मागणी भाजप शहराध्यक्ष व आमदार लक्ष्मण जगताप यांनी या योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इंदू भूषण यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इंदू भूषण यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे, ‘‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गोरगरीब रुग्णांना महागडे उपचार मोफत मिळावेत यासाठी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना सुरू केली आहे.

या योजनेअंतर्गत अनेक महागडे उपचार सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये मोफत करण्यात येतात. त्यामुळे ही योजना देशभरातील गोरगरीब रुग्णांसाठी आरोग्य संजीवनी ठरली आहे. या योजनेअंतर्गत उपचार घेण्यासाठी संबंधित रुग्णांनी नोंदणी करणे गरजेचे आहे. नोंदणीनंतर रुग्णांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे स्मार्ट कार्ड मिळते. त्यानंतर संबंधित रुग्ण या योजनेअंतर्गतच्या मोफत उपचारांसाठी पात्र ठरतो.

शरीराचे तुकडे करून महिलेची हत्या घाटकोपर पोलीस ठाण्यात गुन्हा

■ मुंबई

विद्याविहारच्या नेव्ही गेट जवळ सोमवारी सकाळी घाटकोपर पोलिसांना ३० ते ३५ वयोगटातील एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. या महिलेच्या शरीराचे तुकडे करून आरोपीने याठिकाणी महिलेचा मृतदेह टाकला होता. घाटकोपर पोलिसांनी याबाबत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

सोमवारी सकाळी नऊ वाजण्याच्या दरम्यान विद्याविहार येथील फुटपाथवर एका महिलेचा मृतदेह असल्याची माहिती काही स्थानिकांनी घाटकोपर पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी याठिकाणी पोलिसांनी दोन्ही पाय आणि शीर वेगळे केलेल्या महिलेचा मृतदेह आढळून आला. घाटकोपर पोलिसांनी पंचनामा करत, मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवला आहे. मात्र मृतदेहाचे शीर नसल्याने या महिलेची ओळख पटवणे पोलिसांसाठी मोठे कठीण काम आहे.

याबाबत घाटकोपर पोलिसांनी अज्ञात इसमावर हत्येचा गुन्हा दाखल करत तपासाला सुरुवात केली आहे. तसेच पोलिसांनी परिसरातील काही सीसी टीव्ही चित्रण ताब्यात घेतले असून त्याआधारे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

जम्मू-काश्मीरच्या पाच नेत्यांची अखेर सुटका

■ जम्मू

जम्मू-काश्मीर प्रशासनाने ५ ऑगस्टपासून स्थानबद्ध केलेल्या पाच नेत्यांची अखेर सुटका केली आहे. यात पीपल्स डेमोक्रेटिक पार्टीचे दोन, नॅशनल कॉन्फरन्सचे दोन आणि काँग्रेसच्या एका नेत्याचा समावेश आहे. या सर्व नेत्यांना कलम ३७० च्या अनेक तरतुदी हटवल्या गेल्या तेव्हा अटक करण्यात आली होती. ज्या नेत्यांची सुटका करण्यात आली आहे त्यामध्ये इश्फाक जब्बार आणि गुलाम नबी भट हे नॅशनल कॉन्फरन्सचे नेते, बशीर मीर (काँग्रेस) आणि जहूर मीर, याशिर रेशी (पीडीपी) या नेत्यांचा समावेश आहे. यापैकी याशिर रेशी यांनी पीडीएफ प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री महबूबा मुफ्ती यांच्याविरोधात उघड बंड पुकारले होते. यापूर्वी २५ नोव्हेंबर रोजी पीडीपीचे दिलावर मीर आणि डेमोक्रेटिक पार्टी नॅशनॅलिस्टचे गुलाम हसन मीर यांची सुटका करण्यात आली होती.

कंपन्या कायदा, २०१३ च्या अनुच्छेद २३० अंतर्गत योजनेच्या सादरीकरणासाठीचे आमंत्रण
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापात)

नोंदणीकृत कार्यालय : स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१, महाराष्ट्र. सीआयएन : U45400MH2007PTC234297

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको/कंपनी) यांचे सभासद वा त्यांचा कोणताही वर्ग/धनको वा त्यांच्या कोणत्याही वर्गाकडून कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद २३० अंतर्गत तडजोड व व्यवस्था योजनेच्या आमंत्रणाकरिता सूचना देण्यात येत आहे.

कंपन्या कायदा, २०१३ च्या तरतुदी व इन्सॉल्व्हेन्सी अँन्ड बँकरप्ट्सी कोड, २०१६ अंतर्गत पात्र असलेले कंपनीचे इच्छुक सभासद/धनको कंपनीच्या पुनरुज्जीवनाकरिताची त्यांची योजना अधोहस्ताक्षरितांकडे ई-मेलद्वारे वा मोहोरबंद लिफाफ्यातून खालील निर्देशित कोणत्याही ई-मेल आयडीवर/कार्यालयीन पत्त्यावर सादर करू शकतील. यासंदर्भातील कोणतीही सूचना अधोहस्ताक्षरितांकडे सादर करावी. लवकरात लवकर दि. ३०.०१.२०२० पर्यंत योजना सादर करावी.

सही/-
सीएस विनीत के चौधरी (परिसमापक)
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणी
नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA - 002 / IP - N 00103/2017-2018/10246
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशेष)
ip.vineetchoudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
दूरध्वनी क्रमांक : ०११ - ४९१२१६४४-४५
आयबीबीआयकडे नोंदणीकृत परिसमापकांचा पत्ता :
डी - ३८, एलजीएफ (एल/एस), साऊथ एक्सटेन्शन पार्ट-२, नवी दिल्ली - ११० ०४९.
दिनांक : ३०.१२.२०१९
ठिकाण : नवी दिल्ली

नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

फेर-निविदा सूचना क्र. नमुंमपा/श.अ./ 414 /2019-20

कामाचे नांव :- नेरुळ विभागातील शिरवणे गाव प्र.क्र.89 येथील स्वामी सदगुरु शाळा, मातृपितृ छाया अपार्टमेंट ताराबाई निवास व नमुंमपा शाळा क्र.101 ते कुलदैवत मंदिर, यमुना सदन परिसरात गटर, पदपथ व मल:निस्सारण वाहिण्या बदलणे.

अंदाजपत्रकिय रक्कम रु. 92,67,402/-

या फेरनिविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in आणि www.nmmc.maharashtra.etenders.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही /-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र.-नमुंमपा/जसं/जाहिरात/1213/2019

DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY & PUBLICATIONS, MAHARASHTRA STATE
21-A, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai-400 004
E-mail- dgps.mumbai@maharashtra.gov.in Website- dgps.maharashtra.gov.in
Tel. Nos. 022-23630695/23631148/23632693

E-TENDER NOTICE

Director, Govt. Printing & Stationery, Mumbai (GOM) invites online e-tender from wholly imported origin reputed manufacturers, or its authorizes distributors/authorizes dealers from India or abroad and their Indian reputed/authorized agents to participate in the competitive bidding process to supply of various types of Printing machines.

For the detailed Tender document, interested bidders should visit website - **http://mahatenders.gov.in**

Tender submission would be online and the deadline to submit the tenders is dated 04th January, 2020 up to 12.00 pm.

The Director, Govt. Printing & Stationery, Mumbai reserves the right to increases or to decrease the quantity of tendered equipments & reserves the right to reject the whole/partly tender without any reason thereto.

No.Desk-2B/P-Dev/M.P./AP-2019-20/1635 **Date- 27 DEC. 2019**

Sd/-
Director,
Govt. Printing & Stationery,
Mumbai

डीजीआयपीआर/२०१९-२०२०/४२५७

शेड्यूल २
फॉर्म बी
जाहीर उद्घोषणा
(इन्सॉल्व्हेन्सी अँन्ड बँकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन १२ अंतर्गत)

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी

अ.क्र.	विवरण	तपशील
१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक	१९.०७.२००७
३.	प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/नोंदणीकृत आहे	कंपन्या निबंधक, मुंबई
४.	कॉर्पोरेट ऋणकोंचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर	U45400MH2007PTC234297
५.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास)	**नोंदणीकृत कार्यालय :** स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१, महाराष्ट्र. **प्रधान कार्यालय/कॉर्पोरेट कार्यालय :** १२७, विपुल बिझनेस पार्क, पहिला मजला, सेक्टर-४८, सोहना रोड, गुरगाव-१२२ ०१८, हरयाणा.
६.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया समाप्तीचा दिनांक	०७.०२.२०१९
७.	कॉर्पोरेट ऋणकोची परिसमापन प्रारंभ दिनांक	२७.१२.२०१९ (सन्माननीय न्यायनिर्णित अधिकाऱ्यांचा आदेश दि. २७.१२.२०१९ नुसार)
८.	परिसमापक म्हणून काम करणाऱ्या परिसम पापन अधिकाऱ्याचे नाव व नोंदणीकरण क्रमांक :	**नावः सीएस विनीत कुमार चौधरी** **नोंदणीकरण क्र. :** IBBI/IPA-002/IP-N00103/2017-2018/10246
९.	बोर्डवर नोंदणीकृत म्हणून परिसमापकाचा पत्ता व ई-मेल आयडी	**पत्ता :** डी- ३८, एलजीएफ (एल/एस), साऊथ एक्सटेन्शन पार्ट-२, नवी दिल्ली - ११० ०४९. ई-मेल आयडी : **ip.vineetchoudhary@gmail.com**
१०.	परिसमापकांसमवेत पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता व ई-मेल आयडी	**पत्ता :** व्हीकेसी रिस्ट्रक्चरिंग प्राफेशनल एलएलपी डी - ३८, एलजीएफ (एल/एस), साऊथ एक्सटेन्शन पार्ट-२, नवी दिल्ली - ११० ०४९. **संपर्क क्रमांक :** ०११ - ४९१२१६४४ - ४५, ई-मेल आयडी (प्रक्रिया विशेष) : liquidatorksspetron@vkcindia.com
११.	दावे सादरीकरणाची अंतिम तारीख	२६.०१.२०२०

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, सन्माननीय न्यायनिर्णीत अधिकाऱ्यांनी (राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ) दि. २७.१२.२०१९ रोजी केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या विरोधात कॉर्पोरेट परिसमापन प्रारंभ करण्याचा आदेश दिला आहे.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी दि. २६.०१.२०२० रोजी वा तत्पूर्वीपर्यंत बाब क्र. १० अंतर्गत विहित पत्त्यावर परिसमापकांकडे आपल्या दाव्यांचे पुरावे सादर करावेत.

वित्तीय धनकोनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे इन्सॉल्व्हन्सी अँन्ड बँकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या स्कीम २ मध्ये विहित त्यांच्या संबंधित प्रारूपातून (https://www.ibbi.gov.in/home/downloads) येथे उपलब्ध) तसेच http://www.ksspetron.in येथेही केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. सर्व अन्य ऋणको व्यक्तिशः, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करू शकतील.

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.
सही/-
सीएस विनीत के. चौधरी (परिसमापक)
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणी
नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA - 002 / IP-N00103/2017-2018/10246
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशेष)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
दूरध्वनी क्रमांक : ०११ - ४९१२१६४४ - ४५
आयबीबीआयकडे नोंदणीकृत परिसमापकांचा पत्ता :
डी - ३८, एलजीएफ (एल/एस), साऊथ एक्सटेन्शन पार्ट-२, नवी दिल्ली - ११० ०४९.
दिनांक : ३०.१२.२०१९
ठिकाण : नवी दिल्ली

हरवले आहे

सत्यवान यशवंत सावंत टिळक नगर भारत को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड यांचे **शेअर सर्टिफिकेट** बि. २९, रुम नं. १०१९ / २०५ हरवले आहे. जर कोणाला सापडले असेल तर त्यांनी १५ **दिवसांच्या आत** खालील नंबरवर संपर्क साधावा- टिळक नगर, चेंबूर, मुंबई-४०० ०८९.

संपर्क- ८२९१०२७७८५
०२२२५२२७५९९

जाहीर सूचना

श्रीमती अनसूया आनंद बळीमाने - ज्योती कॉम्प्लेक्स बिल्डिंग नं. ६ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.च्या सभासद, पत्ता जन. ए. के. वैद्य मार्ग, फिल्म सिटी रोड, हनुमान नगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ व सोसायटीच्या इमारतीतील फ्लॅट क्र. ए २०१ च्या धारक या दि. २० जानेवारी, २०१९ रोजी कोणतेही नामनिर्देशन न करता मयत झाल्या.

सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाच्या सदर शेअर्स व नामाधिकारांच्या हस्तांतरणासंदर्भात वारस वा वारसांकडून वा अन्य दावेदार/हरकतदार वा हरकतदारांचा कोणताही दावा वा हरकत असल्यास त्यांनी सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ **दिवसांच्या कालावधीच्या आत** सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाच्या सदर शेअर्स व नामाधिकारांच्या हस्तांतरणासंदर्भात त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/हरकतींच्या पुष्ट्यर्थ असे दस्तावेज व अन्य पुराव्यांच्या प्रतींसमवेत सूचित करावे. वरील विहित कालावधीत कोणताही दावा/हरकत प्राप्त न झाल्यास, सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाच्या सदर शेअर्स व नामाधिकारांच्या हस्तांतरणासंदर्भात सोसायटीच्या उपविधीअंतर्गत तरतुदीनुसार व्यवहार करण्यास सोसायटी मुक्त असेल. सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाच्या सदर शेअर्स व नामाधिकारांच्या हस्तांतरणासंदर्भात असे दावे/हरकती काही प्राप्त झाल्यास सोसायटीच्या उपविधीअंतर्गत तरतुदीनुसार व्यवहार करील. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधींची एक प्रत दावेदार/हरकदारांच्या परीक्षणासाठी सोसायटीचे कार्यालय/सोसायटीच्या सचिवांकडे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून तिचा कालावधी संपेपर्यंत स. १०.०० ते रात्री ८.०० या वेळेत उपलब्ध असेल.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०.१२.२०१९

दी ज्योती कॉम्प्लेक्स बिल्डिंग नं. ६
को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.
करिता व त्यांच्या वतीने
मानद सचिव

रामेश्वर मीडिया